**<u>ठळक बातम्या</u>**

- रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, MSME आणि मध्यमवर्गीयांना प्राधान्य देणारा अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडून सादर

- नवीन आयकर प्रणाली अंतर्गत वाढीव करसवलती, शेअर बाजारातल्या नफ्यावर अतिरीक्त कराची तरतूद

- सोने, चांदी, प्लॅटिनम, मोबाइलला कर सवलती, फ्लेक्स बॅनर स्वस्त होणार

**आणि**

- पायाभूत सुविधा आणि कृषी क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात विविध घोषणा

**<><><><><>**

नवीन आयकर प्रणालीचा स्वीकार करणाऱ्यांसाठी आणखी कर सवलतींचा लाभ देण्याची घोषणा सीतारामन यांनी आजच्या अर्थसंकल्पात केली. अतिरीक्त १ लाख रुपयांच्या उत्पन्नाला त्यांनी विद्यमान दरापेक्षा कमी कर आकारणीची घोषणा केली. त्यामुळं पगारदारांना आता साडे १७ हजार रुपये कमी आयकर भरावा लागेल. नवीन कर प्रणालीत आता ३ लाख रुपयांपर्यंत काहीही कर द्यावा लागणार नाही. ३ ते ७ लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना ५ टक्के, ७ ते १० लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना १० टक्के, १० ते १२ लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना १५ टक्के, १२ ते १५ लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना २० टक्के आणि त्यापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांना ३० टक्के दराने आयकर भरावा लागेल.

नव्या कर रचनेचा पर्याय स्वीकारणाऱ्यांना आता ५० हजारांऐवजी ७५ हजार रुपयांचा स्टँडर्ड डिडक्शन अंतर्गत लाभ मिळेल. निवृत्तीवेतन धारकांसाठी हा लाभ १५ हजारांवरुन २५ हजार रुपये केल्याचं त्यांनी जाहीर केलं.

गेल्या आर्थिक वर्षात आतापर्यंत दोन तृतीयांश करदात्यांनी नवीन आयकर प्रणालीचा पर्याय स्वीकारल्याची माहिती त्यांनी दिली.

नवीन पेन्शन योजनेतल्या कर्मचाऱ्यांना एनपीएसमध्ये भरणा केलेली १० ऐवजी १४ टक्के रक्कम करसवलतीसाठी पात्र असेल.

लहान मुलांच्या नावे नव्या पेन्शन योजनेत गुंतवणूक करण्यासाठी एनपीएस वात्सल्य योजनेची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. त्यानुसार पालक त्यांच्या मुलांच्या नावे नवीन पेन्शन योजनेत गुंतवणूक करू शकतील. मुलं मोठी झाल्यावर याचं रुपांतर नियमित एनपीएस खात्यात करता येईल.

नव्या पेन्शन योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या लाभांचा आढावा घेणाऱ्या समितीचं काम सुरू आहे. वित्तीय परिस्थिती लक्षात घेऊन नवीन आणि जुनी पेन्शनमधली तफावत दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल, असं त्यांनी आज जाहीर केलं.

वर्तमान आयकर कायद्याचा सर्वंकष आढावा घेऊन तो सोपा करण्याचा मानसही त्यांनी जाहीर केला.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज चालू आर्थिक वर्षाचा पूर्ण अर्थसंकल्प लोकसभेत सादर केला. त्यात रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग आणि मध्यमवर्गीयांवर यात विशेष लक्ष देण्यात आलं आहे. नवीन आयकर पद्धत स्विकारणाऱ्यांसाठी त्यांनी विविध सवलतींची घोषणा यात केली. याशिवाय त्यांनी रोजगार निर्मितीसाठी ५ योजनांसाठीचं प्रधानमंत्री

पॅकेज, ५ वर्षात ४ कोटींहून अधिक युवकांच्या कौशल्य विकासासाठीची योजना जाहीर केली.

कृषी क्षेत्रात उत्पादन वाढ, रोजगार निर्मिती आणि कौशल्य वृद्धी, सर्वंकष मनुष्यबळ विकास आणि सामाजिक न्याय, उत्पादन आणि सेवा क्षेत्र, शहरी विकास, ऊर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा, संशोधन आणि नवोन्मेश यासह नव्या सुधारणांना या अर्थसंकल्पात प्राधान्य दिल्याचं त्या म्हणाल्या.

चालू आर्थिक वर्षाचा ४८ लाख २१ हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आज त्यांनी जाहीर केला. या वर्षात ३२ लाख ७ हजार कोटी रुपयांचा महसूल आणि ४ पूर्णांक ९ दशांश टक्के वित्तीय तूट अपेक्षित आहे. या कालावधीत गेल्या आर्थिक वर्षापेक्षा कमी म्हणजेच १४ लाख १ हजार कोटी रुपयांचं कर्ज घेण्याचा सरकारचा मानस आहे.

**<><><><><>**

शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्यांवर अतिरीक्त कर लादण्याचा प्रस्ताव आजच्या अर्थसंकल्पात सादर झाला आहे. त्यामुळं लघु मुदतीच्या नफ्यावर १५ ऐवजी २० टक्के आणि दीर्घ मुदतीच्या नफ्यावर १० ऐवजी साडे १२ टक्के दराने कर द्यावा लागेल. कमी किंवा मध्यम उत्पन्न असणाऱ्यांना सध्या १ लाख रुपयांपर्यंतचा नफा करमुक्त असतो. ही मर्यादा वाढवून आता सव्वा लाख होणार आहे. डेब्ट म्युच्युअल फंडांवरही आता कर द्यावा लागेल. शेअर बाजारात फ्युचर्सचे व्यवहार करणाऱ्यांना आता २ शतांश टक्के आणि ऑप्शनवर १ दशांश टक्के दराने कर द्यावा लागेल. अँजल टॅक्स रद्द करण्याची घोषणाही त्यांनी आजच्या अर्थसंकल्पात केली. क्रुझ पर्यटन, हिरे उद्योगाला काही करसवलती त्यांनी जाहीर

केल्या. देशात गुंतवणूक करणाऱ्या परदेशी कंपन्यांना आता ४० ऐवजी ३५ टक्के दराने कंपनी कर द्यावा लागेल.

<><><><><>

सोने, चांदी आणि प्लॅटिनमवरच्या करांमध्ये अर्थमंत्र्यांनी आज कपातीची घोषणा केली. त्यानुसार सोन्या, चांदीवर ६ टक्के आणि प्लॅटिनमवर ६ पूर्णांक ४ टक्के आयात शुल्क लागेल. मोबाइल, मोबाइलचे चार्जर, कर्करोगावरील आणखी ३ औषधं, एक्स रे मशीनचे साहित्य, विविध धातू, सौर ऊर्जेसाठी लागणारे पॅनल आणि बॅटरी, कोळंबी, माशांचे खाद्य वगैरेंवर कर सवलत आज अर्थमंत्र्यांनी जाहीर केली. त्याचवेळी  फ्लेक्स बॅनर, दूरसंचार उपकरणे, अमोनियम नायट्रेटवरचा कर वाढवला.

<><><><><>

भविष्य निर्वाह निधी धारकांसाठी विविध सवलतींची घोषणा आज अर्थमंत्र्यांनी केली. त्यानुसार पहिल्यांदा नोकरीला लागणाऱ्या सर्व नोकरदारांच्या खात्यामध्ये एका महिन्याचा पगार जमा होईल. दर महिन्याला एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या सुमारे २१ कोटी  युवकांना याचा फायदा होणार आहे. रोजगार निर्मिती करणाऱ्या कंपन्यांसाठीही त्यांनी काही आर्थिक सवलती जाहीर केल्या.

उत्पादन आणि सेवा क्षेत्रांना चालना देण्यासाठी येत्या पाच वर्षांत देशातल्या आघाडीच्या ५०० कंपन्यांमध्ये एक कोटी युवकांना वर्षभरासाठी इंटर्नशिपची संधी दिली जाणार आहे. यात त्यांना प्रति महिना ५ हजार रुपये आणि वर्षातून एकदा ६ हजार रुपये दिले जातील, असं सीतारामण यांनी जाहीर केलं.

तसंच सरकारी आणि खासगी भागीदारीतून जवळपास १०० शहरांमध्ये गुंतवणुकीसाठी सज्ज असलेली प्लग अँड प्ले औद्योगिक पार्क्स विकसित केली

जाणार आहेत. राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमांतर्गत १२ औद्योगिक पार्क्सनाही मंजुरी देण्यात येणार आहे.

औद्योगिक क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांना सरकारी आणि खासगी भागीदारीतून भाडेतत्त्वावर निवासाची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महिलांची संख्या वाढवण्यासाठी संबंधित क्षेत्रांशी सहकार्य प्रस्थापित करून नोकरदार महिलांसाठीची वसतीगृहं, तसंच पाळणाघरं उभारली जातील. राज्य सरकारांशी समन्वयानं पाच वर्षांच्या काळात २० लाख युवांना कौशल्याधारित प्रशिक्षण दिलं जाईल. यासाठी कौशल्य आणि शैक्षणिक कर्जाचीही सोय उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती सीतारामण यांनी दिली.

**<><><><><>**

मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातल्या पहिल्या अर्थसंकल्पात **कृषी क्षेत्रासाठी** अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**शेतीची उत्पादकता** वाढवण्यासाठी आणि बदलत्या हवामानानुसार बियाणांच्या वाणाची निर्मिती करण्यासाठी सर्वसमावेशक कृषी संशोधन यंत्रणेचं पुनर्परीक्षण करण्यात येईल, असं अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी संसदेत अर्थसंकल्प मांडतानाच्या भाषणात सांगितलं. सरकार आणि तज्ञ यावर देखरेख करणार आहेत. **तेलबिया, कडधान्यं** या बाबतीत स्वावलंबी होण्यासाठी त्यांचं उत्पादन, साठवण आणि विपणन यंत्रणा मजबूत करणार असल्याची ग्वाही अर्थसंकल्पातून देण्यात आली. मोहरी, भूईमूग, तीळ, सोयाबीन, सूर्यफूल या तेलबियांच्या बाबतीत आत्मनिर्भर होण्यासाठी सरकार योजना आखत आहे. तसंच कोळंबी शेतीत प्रक्रिया आणि निर्यातीसाठी नाबार्डच्या माध्यमातून वित्तपुरवठा केला जाणार आहे.

**<><><><><>**

पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात गुंतवणुकीसाठी केंद्र सरकार मदत देणार असून यावर्षी भांडवली खर्चासाठी ११ लाख ११ हजार १११ कोटी रुपयांची गुंतवणूक केंद्र सरकार करणार असल्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली आहे. ही गुंतवणुक देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ३ पूर्णांक ४ दशांश टक्के असेल. राज्यांसाठी पायाभूत सुविधांसाठी विकासासाठी दीर्घकालीन व्याजमुक्त कर्जासाठी सुमारे दीड लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

सरकार पायाभूत सुविधांमध्ये खाजगी क्षेत्रांना गुंतवणुकीसाठी सवलती देणार आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या चौथ्या टप्प्यात २५ हजार गावं रस्त्यांनी जोडली जाणार आहेत.

**<><><><><>**

महिला केंद्री विकासाला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात तीन लाख कोटी रुपये महिला तसंच मुलींसाठी असलेल्या योजनांना मंजूर करण्यात आले आहेत. आर्थिक विकासात स्त्रियांचा वाटा वाढवण्याच्या दृष्टीने आमच्या सरकारची वचनबद्धता दिसून येते.

आदिवासीबहुल गावे आणि जिल्हे यांच्या मधल्या आदिवासी कुटुंबांसाठी प्रधानमंत्री जनजाती उन्नत ग्राम अभियान सुरु केलं जाईल. त्याचा लाभ ६३ हजार गावं आणि ५ कोटी आदिवासींना होईल.

**<><><><><>**

ग्रामीण आणि शहरी भागात जमीन सुधारणा आणि व्यवस्थापनसंबंधी नवे नियम लागू करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यता आली आहे. पुढच्या तीन वर्षात ही व्यवस्था लागू करण्यात येईल.

ग्रामीण भागातल्या जमिनीच्या व्यवहारासाठी भू आधार कार्ड किंवा युनिक लँड पार्सल आयडेंटिफिकेशन नंबर देण्यात येईल, तसंच नकाशांचं डिजिटायजेशन करण्यात येईल. यामुळे कर्ज आणि इतर कृषी सुविधांचा लाभ मिळणं सहज होणार आहे.

**<><><><><>**

अर्थसंकल्प सादर होत असताना देशातल्या शेअर बाजारातली घसरण वाढत गेली. सत्रादरम्यान सेन्सेक्स १ हजार अंकांहून अधिक घसरला होता. अर्थसंकल्प पूर्ण सादर झाल्यावर ही घसरण थोडी कमी झाली.

**//<><><><><>//**